# फ्लिपकार्टची सफारी इंडस्ट्रीज समवेतची भागिदारी अधिक बळकट, पैशांचा योग्य परतावा हवा असलेल्या ग्राहकांसाठी ‘मॅग्नम’चा शुभारंभ

*या धोरणात्मक भागिदारीमुळे मॅग्नम प्रथमच ऑनलाइन उपलब्ध*

**बंगळुरू, १३ ऑक्टोबर २०२० :** फ्लिपकार्ट या एतद्देशीय ई कॉमर्स बाजारपेठेने आपल्या व्यासपीठावर मॅग्नम या किफायतशीर दरातील प्रवासी बॅगेचा शुभारंभ करण्यासाठी सफारी इंडस्ट्रीज समवेत भागिदारी केली आहे. खरेदीच्या सुलभ पर्यायांबरोबरच किफायतशीरपणा आणि पैशांचे पुरेपूर मूल्य यांना ग्राहक वाढत्या प्रमाणात प्राधान्य देत असून विशेषत: प्रवासासाठी गरजेच्या असलेल्या वस्तूंच्या बाबतीत हे निकष प्रामुख्याने लावले जात असताना या दोन ब्रँड्सच्या एकत्र येण्यामुळे ग्राहकांना निवडीला अधिक वाव मिळणार आहे. आगामी उत्सव पर्वासाठी भारतीय सज्ज होत असून फ्लिपकार्ट देखील बिग बिलियन डेजच्या निमित्ताने भारतीय ग्राहकांसाठी सर्वोत्तम ब्रँड्स उपलब्ध करून देण्याची तयारी करत असताना ही भागिदारी महत्त्वाची ठरणार आहे.

या भागिदारीच्या माध्यमातून मॅग्नमला अधिक व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊन नवीन भौगोलिक प्रदेश आणि पिन कोड्सवर ते सेवा पुरवू शकतील. यात १०० टक्के पॉलिकार्बोनेटपासून बनवलेल्या कडक (हार्ड) बॅग्ज, तसेच मजबूत, टिकाऊ फॅब्रिक पासून बनवलेल्या लवचिक (सॉफ्ट) बॅग्ज यांचा समावेश असून त्यांना सफारीच्या विश्वासार्ह वॉरंटीचे पाठबळ आहे.

पैशांचा परतावा देणाऱ्या परिपूर्ण उत्पादनांच्या शोधात असलेल्या ग्राहकांना डोळ्यांसमोर ठेवून बनवण्यात आलेली मॅग्नमची उत्पादने म्हणजे टिकाऊपणा आणि शैलीची हमी असून शैलीदार प्रवाशांसाठी सामान वाहून नेण्याचा विश्वासार्ह साथीदार आहे. गेल्या तीन वर्षांत या ब्रँडची ४० टक्के सीएजीआर या वेगाने वाढ झाली असून देशभरात २२०० हून अधिक दुकाने आहेत. आता फ्लिपकार्टसमवेतच्या ऑनलाइन भागिदारीच्या माध्यमातून नवे पर्व सुरू होत असून भौगोलिक व्याप्ती आणि व्यवसायाची व्यापकता वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

फ्लिपकार्टसमवेतच्या मॅग्नमच्या भागिदारीबाबत **सफारी इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सुधीर जातिया** म्हणाले, *“सुरुवातीच्या पातळीवरील किमतीत (एंट्री लेव्हल) टिकाऊ व शैलीदार उत्पादने हवी असलेल्या ग्राहकांना नजरेसमोर ठेवून मॅग्नमची निर्मिती करण्यात आली आहे. या वर्षीच्या मार्च महिन्यापासून केवळ मौजमजेसाठी प्रवास करण्याऐवजी अत्यावश्यक कारणासाठी प्रवास करण्याला महत्त्व आले आहे. या काळात अनेक लोक त्यांच्या सामानसुमानासकट आपल्या मूळ गावी परतल्यामुळे किफायतशीर किमतीतील बॅगांच्या मागणीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. या बदलत्या परिस्थितीचा विचार करून देशभरातील ग्राहकांना आमची उत्पादने उपलब्ध व्हावीत, यासाठी फ्लिपकार्टसमवेत भागिदारी केली आहे. या धोरणात्मक भागिदारीच्या माध्यमातून आम्ही ॲक्मे आणि*

*स्टॉर्म या दोन सहउत्पादनांची निर्मिती केली असून यामुळे ग्राहकांच्या अनेक गरजा पूर्ण होतील. या भागिदारीमुळे आम्हाला नव्या बाजारपेठांमधील संधीचा लाभ घेऊन नव्या ग्राहकांपर्यंत पोहोचता येईल, याची आम्हाला खात्री आहे."*

या शुभारंभाबाबत **फ्लिपकार्ट फॅशनचे उपाध्यक्ष निशित गर्ग** म्हणाले, *"फ्लिपकार्टची सर्वदूर पोहोच आणि मॅग्नमची मूल्यकेंद्रित उत्पादने यांना एकत्र आणणारी ही भागिदारी असून यामुळे आम्हाला पैशांच्या परताव्याबाबत जागरुक असलेल्या देशभरातील ग्राहकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहोचता येईल. शैलीदार जीवनशैली जगतानाच ग्राहकांना टिकाऊ पर्याय देण्याच्या सामायिक उद्‌दिष्टांनी आम्ही एकत्र आलो असून लक्षावधी भारतीय ग्राहकांना श्रेणीतील सर्वोत्तम उत्पादन देण्याचे आमचे ध्येय अधोरेखित कणारी ही भागिदारी आहे."*

## About Flipkart Group

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 250 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns –customer centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

## About Safari Industries

Safari Industries has been one of the prominent names in the market when it comes to luggage and backpacks. In the past 45 years, Safari Industries has seen many milestones, and through these 4 decades, the Safari promise of quality and the fulfilling experience of using the product is what took the company from one milestone to another and drove consumers across generations to choose it over and over again. This relationship between the consumer and Safari is what has driven it to become an 800+ crore company (FY 20). Started in 1974, the company offers a wide variety of luggage and backpacks including soft luggage, hard luggage and casual, semi-casual and formal backpacks that are ideal for every travel need, through an impressive portfolio of brands including Safari, Magnum and Genius & Genie.

For more information, please write to **media@flipkart.com**